Sakal 11 August 2023

# समुद्र किनाऱ्यालगत कृत्रिम भित्तिका

माशांच्या जातींचे संरक्षण करण्याच्या पार्श्वभूमीवर रत्नागिरी मत्स्य विभागातर्फे या वर्षी जिल्ह्यातील २५ गावांमध्ये समुद्र किनाऱ्यालगत कृत्रिम भित्तिका उभारण्यात येणार आहेत.

रत्नागिरी जिल्ह्याला १६७ किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. भारताच्या मत्स्योत्पादनाचा अभ्यास केल्यास ६५ ठळक मत्स्य जातींपैकी ३५ मत्स्य जातींचे मत्स्योत्पादन शून्य असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे मासेमारी, मत्स्य व्यवस्थापन आणि मत्स्य प्रजातींचे संरक्षण काळाची गरज असल्याचे मत्स्य विभागाचे मत आहे. त्यामुळेच यावर्षी मत्स्य विभागातर्फे जिल्ह्यात कृत्रिम भित्तीका उभारण्यात येणार आहेत. तामिळनाडू येथील सेंट्रल मरीन फिशरिज रिसर्च इन्स्टट्यूटचे प्रधान शास्त्रज्ञ डॉ. जो. किझाकुडम हे रत्नागिरीत आले होते. त्यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील दापोली, कोंड कारुळ, रत्नागिरी आणि साखरी नाटे या गावात जनजागृती करण्यासाठी बैठकाही आयोजित करण्यात आल्या होत्या, असे मत्स्य विभागाकडून सांगण्यात आले.

कृत्रिम भित्तीका...

कृत्रिम भित्तीका मासळी एकत्रित करण्याचे एक शास्त्रोक्त अभ्यास करून निर्माण केलेले साधन आहे. हे साधन समुद्राच्या तळावरील आढळणारी वनस्पती व मासळीची उपलब्धता विकसित करण्यासाठी तसेच मासळी समूहांना एकत्रित करण्यासाठी आणि सदर मासळीची पैदास करून त्यांना घरासारखे सानिध्य निर्माण करून देतात. कृत्रिम भित्तीकांची पाखरण करण्यासाठी पाण्याची खोली, जल प्रदूषण, समुद्रकिनारा, पाण्याची पारदर्शकता, लाटांचे प्रमाण या गोष्टींचा अभ्यास केला जातो.